# सुराज्य

२६ जानेवारी प्रजासत्ताक दिनाच्या सर्व देशवासियांना शुभेच्छा

www.surajyadigital.com | शुक्रवार, दि.२६ जानेवारी २०२४ | वर्ष : २२ वे | अंक : १०८ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८


# ‘वंचित’चे हायकमांड जाम भडकले

## निमंत्रण अंगलट आले, पटोलेंना बसले ‘टोले’

सुराज्य/सोलापूर

**लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडी आणि वंचित बहुजन आघाडी यांचे सूत जुळते की नाही?हा गंभीर प्रश्न समोर आला आहे. ॲड.प्रकाश उर्फ बाळासाहेब आंबेडकर यांच्या आघाडीला महाविकास आघाडीत सामावून घ्यायचे की नाही यावरून महाविकास आघाडीत तू तू...मैं मैं..सुरू आहे. हा निर्णय शरद पवार आणि उद्धव ठाकरे हेच घेतली, असे वारंवार सांगितले जात आहे.अशा स्थितीत महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष नाना पटोले यांनी जागा वाटपाची चर्चा करण्यासाठी आंबेडकरांना पत्र धाडले पण हा प्रकार पटोलेंच्या अंगलट आला.नानांना टोले खावे लागले. पटोलेंच्या या कृतीवर बाळासाहेब जाम भडकले. पटोले यांना इंडिया आघाडी किंवा महाविकास आघाडीसंबंधी निर्णय प्रक्रियेमध्ये कोणतेही अधिकार नसताना त्यांच्या सहीने वंचितला बैठकीसाठी कसे काय आमंत्रण दिले गेले? असा प्रश्न आंबेडकरांनी विचारला आहे. पटोले यांना महाराष्ट्रात कुणाशी आघाडी करायचे याचा निर्णय घेण्याचा अधिकार आहेत का? असा प्रश्नही त्यांनी विचारला. पटोले हे महाराष्ट्राच्या जनतेसोबत माईंड गेम खेळतात किंवा त्यांच्या डोक्यामध्ये काहीतरी लोचा झाल्याची टीका त्यांनी केली.**

राज्यातील महाविकास आघाडीच्या नेत्यांची लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जागावाटपाची चर्चा २५ जानेवारी रोजी होणार होती. त्या बैठकीसाठी वंचित बहुजन आघाडीलाही निमंत्रण देण्यात आले होते. तशा आशयाचे महाविकास आघाडीकडून एक पत्रक जारी करण्यात आले असून त्यावर राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले आणि शिवसेनेचे नेते संजय राऊत यांच्या नावाच्या सह्या आहेत. त्यावर आंबेडकरांनी प्रश्न उपस्थित केले आहेत.ऐनवेळी पाठवलेल्या निमंत्रणाबद्दल आंबेडकरांनी महाविकास आघाडीच्या बैठकीकडे पाठ फिरवली. अंदर की बात वेगळीच.आंबेडकरांना निमंत्रणच मिळालेले नाही,असे वंचितच्या एका नेत्याने सांगितले.

वंचित आघाडीचे मुख्य प्रवक्ते सिद्धार्थ मोकळे यांनी आधीच सांगितले होते की- महाविकास आघाडीत सहभागी होण्यासाठी उद्धव ठाकरे, शरद पवार, मल्लिकार्जुन खर्गे यांच्याकडून निमंत्रण येत नाही तोपर्यंत आम्ही सहभागी होणार नाही. जर तुम्हाला वाटत असेल आम्ही सहभागी व्हावे तर शिवसेना, राष्ट्रवादी आणि काँग्रेसच्या अध्यक्षांकडून आम्हाला आमंत्रण मिळाले पाहिजे किंवा रमेश चेन्निथला, राहुल गांधी, सोनिया गांधी आणि मल्लिकार्जुन खर्गे यांच्यापैकी कोणीही निमंत्रण दिल्यास आम्ही बैठकीला उपस्थित राहू. आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गेल्या काही दिवसांपासून चर्चेचा केंद्रबिंदू झालेल्या आंबेडकर यांना महाविकास आघाडीकडून चर्चेसाठी निमंत्रित करण्यात आले होते. त्यामुळे चर्चेची कोंडी फुटण्याची शक्यता होती. आंबेडकर यांनी गेल्या काही दिवसांपासून इंडिया आघाडी तसेच महाविकास आघाडीकडून चर्चेसाठी कोणतेच निमंत्रण नसल्याचे जाहीरपणे सांगितले होते. त्यामुळे चर्चा होणार तरी कधी? अशी चर्चा रंगली होती. मात्र, गेल्या २४ तासात इंडिया आघाडीमध्ये झालेल्या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीकडून आंबेडकर यांना तातडीने चर्चेसाठी बोलावण्यात आले होते. त्यामुळे या बैठकीत काय चर्चा होते, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागून होतेमात्र पटोलेंचा खेळ अंगलट आला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना आणि काँग्रेस या महाविकास आघाडीतील घटक पक्षामध्ये जागावाटपावरुन अद्याप एकमत झाले नाही. शिवसेना २३ जागांवर ठाम आहे. त्याशिवाय काँग्रेसलाही जास्त जागा हव्या आहेत. त्यामुळे मागील काही दिवसांत बैठकात तोडगा निघालेला नाही. त्यात प्रकाश आंबेडकर आणि राजू शेट्टी यांना तीन जागा देण्याबाबत चर्चा सुरु आहे.



## आंबेडकर म्हणाले, तुमच्या डोक्यात केमिकल लोचा झालाय, माईंडगेम खेळू नका

### काय म्हणाले आंबेडकर?

काँग्रेस हायकमांडकडून तुम्हाला आघाडी करण्याचे किंवा युती करण्याचे महाराष्ट्रात अधिकार दिले आहेत का? असा प्रश्न आंबेडकरांनी पटोले यांना विचारला. एकीकडे काँग्रेस महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्निथला यांनी २३ जानेवारीला झालेल्या पत्रकार परिषदेत स्पष्ट केले होत की- निवडणुकांची घोषणा झाल्यावर वंचितला आघाडीत समाविष्ट होण्यासाठी चर्चा करू. तर दुसरीकडे महाराष्ट्रातील लोकांच्या मनात संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न पटोले करत आहेत. मविआ आणि इंडिया आघाडीमध्ये वंचितला समाविष्ट करण्याचा निर्णय घेण्याचे सर्वोत्तपरी अधिकार तुम्हाला नाहीत.

### राऊत सावध झाले



मुंबईत आठ तासांनी महाविकास आघाडीची बैठक पार पडली.त्यावेळी पत्रकारांनी शिवसेना ठाकरे गटाचे प्रवक्ते संजय राऊत यांना गाठले.त्यावेळी आंबेडकरांच्या खरमरीत पत्राचा विषय काढला तेव्हा राऊत यांनी सावध पवित्रा घेतला.आंबेडकरांशी आमचा संवाद कायम आहे.येत्या ३० जानेवारीच्या बैठकीला ते उपस्थित असतील,असेही ते म्हणाले.

## मुंबई पोलिसांनी परवानगी नाकारली

### मनोज जरांगे पाटील आझाद मैदानावर येण्यावर ठाम!

सुराज्य/मुंबई



मनोज जरांगे पाटील यांना आझाद मैदानावर आंदोलन करण्यास मुंबई पोलिसांनी परवानगी नाकारल्यानंतरही जरांगे पाटील मुंबईत येण्यावर ठाम आहेत.

मराठा मोर्चाचे समन्वयक वीरेंद्र पवार यांना आझाद मैदानातील एका बाजूला आंदोलन करण्यासाठी परवानगी दिलेली आहे, असं त्यांनी मला कळवलं आहे. तिथे स्टेज उभारणीचं कामही सुरू आहे, त्यामुळे मी इथून आझाद मैदानात जाणार आहे.

दरम्यान वाटेत जर शासनाच्या शिष्टमंडळाने चर्चा करण्यासाठी आले तर नक्की चर्चा करेन, असं मनोज जरांगे पाटील यांनी सांगितलं. आमचे आणि मुंबईकरांचे हाल होऊ नयेत, हे सरकारच्या हातात आहे, असं सांगताना मुंबईत येण्यावर ठाम असल्याचं जरांगे यांनी ठणकावून सांगितलं. मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी लाखोंचा जत्था घेऊन राजधानी मुंबईच्या दिशेने कूच करणाऱ्या मनोज जरांगे पाटील यांच्या आझाद मैदानात आंदोलनाला मुंबई पोलिसांनी परवानगी नाकारली आहे. आंदोलनासाठी राखीव असलेल्या आझाद मैदानाची इतकी क्षमता नसल्याचं सांगत उपोषणासाठी पोलिसांनी नवी मुंबईतील खारघर येथील सेक्टर २९ मधील इंटरनॅशनल कॉर्पोरेशन पार्क मैदान सुचवलं आहे. त्यानंतर काही क्षणांतच मनोज जरांगे पाटील यांनी लोणावळा येथून माध्यमांशी संवाद साधला. आम्ही मुंबईला मजा करायला येत नाही. आम्हाला आरक्षण द्या, आम्ही घरी जातो, असा आक्रमक पवित्रा जरांगे यांनी घेतला. रात्री लोणावळ्यात मुक्काम केलाय, अजूनही लोणावळ्यात थांबलो आहेत.

## सुराज्य

### उद्याचा अंक नाही

भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त ‘सुराज्य’ कार्यालयास शुक्रवार दि.२६ जानेवारी २०२४ रोजी सुट्टी असल्याने उद्या दि. २७ जानेवारी २०२४ चा अंक प्रकाशित होणार नाही, याची नोंद वाचक, विक्रेते, जाहिरातदार यांनी घ्यावी, ही विनंती.

- संपादक

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



’वेपन डीलर’ आहेत का त्या?

| |
|---|
| कल्याण |
| 137-14-680 |
| मुंबई |
| 236-16-358 |

## सोलापूरच्या विद्या कुलकर्णी यांना राष्ट्रपती पदक जाहीर



**सोलापूर** : उत्तर तालुक्यातील तिऱ्हे येथील विद्या जयंत कुलकर्णी यांना (आयपीएस) सीबीआयच्या जॉइंट डायरेक्टरपदी उल्लेखनीय सेवेबद्दल राष्ट्रपती पदक जाहीर झाला आहे.

त्यांचे मूळ गाव तिऱ्हे, पंढरपूर हे आजोळ आहे. त्या सन १९९८ बॅचच्या तामिळनाडू केडरच्या आयपीएस आहेत. तिऱ्हे येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत प्राथमिक, संगमेश्वर कॉलेजमध्ये उच्च माध्यमिक शिक्षकानंतर सांगली येथील वालचंद महाविद्यालयातून बीई (कॉम्प्यूटर) पदवीचे शिक्षण घेतले. सध्या त्या सीबीआयच्या जॉइंट डायरेक्टर (साऊथ झोन) पदावर दिल्ली येथे कार्यरत आहेत. धुळे येथील सार्वजनिक बांधकाम विभागातील कार्यकारी अभियंता वर्षा घुगरी यांच्या त्या लहान भगिनी आहेत.राष्ट्रपतींच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात येणार आहे.

## सोलापुरात गारठा वाढला

**सोलापूर** : उत्तर भारतामध्ये शीतलहरी आल्या आहेत, याचा परिणाम देशभरातील तापमानावर होत आहे. सोलापुरातील किमान तापमानात घट झाली असून, सकाळी - रात्री गारवा तर दुपारी उन्हाचा चटका बसत आहे. गुरुवार २५ जानेवारी रोजी किमान तापमान हे १४.८ अंश सेल्सिअस इतके होते. रविवारपासून गुरुवारपर्यंत तापमानात ४ अंश सेल्सिअसची घट झाली.

## जास्त नफ्याचे आमिष दाखवून २३ लाखास गंडविले

**सोलापूर** : शेअर मार्केटमध्ये पैसे गुंतवल्यास जास्त नफा मिळवून देतो असे सांगून एका वृद्ध इसमास २३ लाख ४९ हजारास गंडविल्याची घटना (मुगळी ता. अक्कलकोट) येथे घडल्याचे उघडकीस आली.

या प्रकरणात अक्कलकोट दक्षिणच्या पोलिसांनी प्रायमरी शेअर मार्केटच्या एका मोबाईलधारका विरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. यासंदर्भात गुरुशांतप्पा शिवप्पा पाटील यांनी पोलिसात नुकतीच फिर्याद दाखल केली. त्यांच्या मोबाईलवर एका अनोळखी इसमानी प्रायमरी शेअर मार्केटमध्ये जास्त नफा मिळवून देतो. असे सांगून त्यांना प्रायमरी शेअर मार्केटमध्ये खरेदी विक्री करण्यास सांगितले. त्याप्रमाणे त्यांनी ३ डिसेंबर २०२२ ते ३ जानेवारी २०२४ या दरम्यान खरेदी विक्रीचा व्यवहार केला. त्यात त्यांचे २३ लाख ४९ हजार रुपयाची फसवणूक झाली. तपास पोलीस निरीक्षक स्वामी करीत आहेत.

## विराट कोहली ठरला ’आयसीसी वनडे क्रिकेटर ऑफ द इयर’



**मुंबई** : भारतीय फलंदाज विराट कोहली ’आयसीसी वनडे क्रिकेटर ऑफ द इयर’ बनला आहे. विराटने २०२३ च्या वनडे वर्ल्डकपमध्ये दमदार कामगिरी केली होती. विराट कोहलीने चौथ्यांदा हा किताब पटकावलाय. २०१२, २०१७ आणि २०१८ मध्येही विराट ’आयसीसी वनडे क्रिकेटर ऑफ द ईयर’ बनला होता. विराट कोहलीने दिमाखदार कामगिरीची मालिका सुरुच ठेवली आहे.

विराटच्या फटकेबाजीच्या जोरावर टीम इंडियाने २०२३ च्या विश्वचषकात सलग १० सामने जिंकत अंतिम फेरीत धडक मारली होती. मागील वर्षी वनडे क्रिकेटमध्ये विराटने दिमाखदार कामगिरी केली. त्याने २७ सामन्यांमध्ये १३७७ धावा केल्या. एवढेच नाही तर विराटने गेल्या ७ वर्षांच्या मोठ्या कालखंडानंतर गोलंदाजी करत विकेट देखील पटकावली. सलग ३ वर्षे विराटला एकही शतक झळकावता आले नव्हते. त्यानंतर विराटला टीकेला सामोरे जावे लागले होते.

एकेकाळी विराट भारतीय संघाचा भाग कशामुळे? असा सवालही उपस्थित करण्यात येत होता.

# सोलापूर बाजार समितीत कांद्याची विक्रमी आवक

सुराज्य/सोलापूर

**सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या ५० वर्षाच्या इतिहासात देशात गुरुवारी विक्रम करणारी कांद्याची आवक झाली तब्बल दीड हजार गाड्यातून एक लाख ४४ हजार ८०१ क्विंटल कांद्याची आवक झाली आहे. मोठ्या प्रमाणात भाव गडगडल्याने कांद्याला भाव किमान १०० तर कमाल १७७५ रुपये तर सर्वसाधारण १०० रुपये प्रति क्विंटल दर मिळाला.यातून बाजार समितीत एका दिवसात दहा कोटी तेरा लाख रुपयांची उलाढाल झाली.**

## १५०० गाड्यांमधून दीड लाख क्विंटल कांदा आला
## भाव गडगडले; तरी देखील दहा कोटीची उलाढल

राज्यात दुसऱ्या स्थानावर असलेल्या सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीत गुरूवारी कांद्याच्या तब्बल १४४८ इतक्या गाड्यांची विक्रमी आवक झाली. यामुळे दरात मात्र मोठी घसरण झाल्याने कांदा उत्पादक शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसला दुसरीकडे कोथिंबिरीला अवघा एक रुपया दर मिळाल्याने संतप्त झालेल्या शेतकऱ्याने कोथिंबीर रस्त्यावर फेकून देत सरकारच्या जाचक आणि मारक धोरणाचा निषेध नोंदविला. सोलापूर बाजार समितीत कांद्याच्या दरात गेल्या आठवड्याच्या तुलनेत क्विंटलमागे तब्बल आठशे ते हजाराची घसरण झाली आहे. मंगळवारी १६०० रुपये भाव मिळालेल्या त्याच कांद्याला गुरूवारी ९५० रुपयांचा भाव मिळाला.

सर्वच प्रकारच्या कांद्याच्या दरात मंगळवारच्या तुलनेत निम्म्या फरकाने कमी भाव मिळाला. यामुळे शेतकरी संतप्त झाले होते. बाजार समितीत जिकडे पाहील, तिकडे कांदाच दिसत होता. कांदा सेल हॉल व परिसर, फुल बाजार, गूळ मार्केट, भुसार बाजार याठिकाणी सर्वत्र कांद्याची पोतीच दिसत होती. बुधवारी रात्रीपासून वाहतुकीची झालेली कोंडी गुरूवारी सकाळपर्यंत होती. सोलापूर जिल्ह्यासह पुणे, अहमदनगर, धाराशिव, लातूर,



बीड कर्नाटकातील कलबुर्गी, बिदर, विजयपूर परिसरातून मोठ्या प्रमाणात कांद्याची आवक झाली. हा कांदा उतरविण्यासाठी हमालही मिळत नव्हते. याचा शेतकऱ्यांना फटका बसला यामुळे बाजार समिती प्रशासनाचे नियोजन पुरते कोलमडले होते.

**कांदा रस्त्यावर :** भाव पडल्याने शेतकऱ्यांनी बाजार समिती कार्यालयासमोर निर्यातबंदी हटावच्या जोरदार घोषणा देत मोदी सरकारचा निषेध केला. गोंधळाची परिस्थिती निर्माण झाल्याने बाजार समितीचे संचालक केदारनाथ उंबरजे, सचिव दत्तात्रय सूर्यवंशी आणि जेलरोड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक जाफर मोगल यांनी शेतकऱ्यांना शांत करण्याचा प्रयत्न केला. मात्र शेतकरी ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हते. एका शेतकऱ्याने तर आपला कांदा रस्त्यावर फेकून निषेध केला.

**नियोजनाचा फटका :** बाजार समिती प्रशासनाने वाढत्या गर्दीवर नियंत्रणासाठी एक दिवसाआड कांदा लिलावाचा निर्णय घेतला मात्र प्रशासनाचे नियोजन चुकले सुट्टीच्या दुसऱ्या दिवशी दुप्पट आवक होत असल्याने यांचा फायदा व्यापाऱ्यांनी घेत आपली पोळी भाजून घेत असल्याचा आरोप यावेळी काही शेतकऱ्यांनी केला.

**पोलिसाची दडपशाही :** बाजार समितीच्या आवारात गुरुवारी कवडीमोल दराने कांद्याची विक्री होत होती. वर्षभर काबाडकष्ट करून उत्पादित मालाची बाजारातील ही अवस्था पाहून संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी बाजार समिती कार्यालयासमोर उत्स्फूर्तपणे ठिय्या मांडून आंदोलनाला सुरुवात केली. शेतकऱ्यांचे प्रतिनिधी म्हणून घेणारे एकही संचालक इकडे फिरकले नाहीत. उलट बाजार समिती प्रशासनाने पोलिसांच्या माध्यमातून शेतकऱ्यांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न केला.